## AJB & TTP / Technique

काय मित्रांनो , शीर्षक वाचून बुचकळयात पडलात ना ? बरेच दिवस हा विषय मनात घोळत होता. परंतु गेल्या काही दिवसात अशा काही घटनां घडल्या की मला हा विषय तुमच्याशी बोलण्यावाचून चैनच पडेना.

हा विषय तसा आपल्या सर्वांच्याच परिचयाचा आहे. परंतु आपण ह्या प्रकारच्या वागणुकीवर फारसा विचार करत नाही म्हणूनच केवळ हा विषय बघून आपण बुचकळयात पडला असाल.

तुमची उत्सुकता (curiosity) मी फार ताणत नाही. प्रथम ह्या शीर्षकाचा पूर्ण अर्थ सांगतो व मग उदाहरणे देऊन विषय समजावण्याचा प्रयत्न करतो.

A - Accept
J - Justify
B - Blame
TP - Theoretical Possibility
TP - Technical Possibility
PP - Practical Possibility

आपली वर्तणुक या मार्गावरून चालावी अशी अपेक्षा असते. परंतु ब-याच लोकांच्या बाबतीत ह्या ७ पैकी काही टप्पे घेतलेच जात नाही व हीच गोष्ट आपल्या सुखाच्या आड येण्याचा संभव असतो.

प्रस्तावना फारच लांबली. आता विषय सोपा करून सांगण्याचा प्रयत्न करतो.

जेव्हा एखादी गोष्ट आपल्या मनासारखी घडत नाही , ठरविलेली गोष्ट होत नाही , अपयश येते त्यावेळी आपली वर्तणुक ABJ च्या मार्गावरून चालावी अशी अपेक्षा असते. पण असे घडते का ? बरेच वेळा नाही. दोनच स्टेशने ह्या मार्गावर बरेच लोक घेतात. ती स्टेशने म्हणजे J & B. A स्टेशन घेतलेच जात नाही व त्यामुळेच ह्या अपयशातून माणूस काहीच शिकत नाही.

खरेतर ही परिस्थिती उद्भवते ती TTP / P च्या मार्गाचा नीट विचार न केल्यामुळेच.
कोणतीही गोष्ट घडण्याची शक्यता कागदावर कधीही जास्तच असते. (Theoretical Possibility) परंतु ती गोष्ट साकार करण्यासाठी तांत्रिक बाबी (Technical) अनुकूल असाव्या लागत्यात व त्यानंतर ती गोष्ट प्रत्यक्षात येण्याची शक्यता (Practical Possibility) पडताळून पहावी लागते.

माझ्या स्वतःच्या उदाहरणावरूनच मी तुम्हाला ह्या concepts समजावतो. तुम्हाला माहितीच आहे की मला डॉक्टर व्हायचे होते. डॉक्टर होण्याची Theoretical Possibility होती. किमान बुद्धिमता होती. (Technical Possibility) परंतु कौटुंबिक परिस्थिती ( पैसा , घरचा आधार ) अनुकूल नव्हती ( Practical Possibility) .त्यामुळेच मी Commerce चे शिक्षण घेण्याचे ठरविले व त्यातील अतिउच्च शिक्षण घेतले.हे मी करू शकलो कारण आपण डॉक्टर होऊ शकणार नाही ही गोष्ट मी मनापासून स्वीकारली. (Accept). मी डॉक्टर का होऊ शकलो नाही ह्या गोष्टीचे (Justify) समर्थनही केले. कोणाला दोष (Blame) देण्याचा प्रश्नच नव्हता. दोष द्यावयाचा तर नशीबाला. पण हा दोषही मी दिला नाही कारण माझ्या वडिलांचे संस्कार. जे मिळाले त्यावर मी लहानपणापासूनच प्रेम केले. पळत्याच्या मागे मी कधी लागलो नाही.

आता गेल्या काही दिवसातील गोष्टच तुम्हाला सांगतो. ह्या गोष्टींच्या विश्लेषणावरूनच मी हा लेख लिहण्याचे ठरविले.

माझ्या मित्राचा मुलगा १२ वीची परिक्षा ७0 % मार्क मिळून पास झाला. हा मुलगा शाळेत हुशार होता असे म्हणावे लागेल कारण साधारपणे ८0 – ८५% मार्क त्याला मिळत. SSC नंतर ह्या मुलाने IIT च्या प्रवेश परिक्षेचा अभ्यास करण्याचा निर्णय घेतला व class ही सुरू केला. दुपारी कॉलेज व संध्याकाळी क्लास असा भरगच्च दिनक्रम सुरू झाला. हा मुलगा रात्री १0 वाजेपर्यंत घरी येई. IIT च्या प्रवेश परिक्षेच्या अभ्यासाबरोबर CET चा अभ्यासही सुरू होता. अर्थात त्याला IIT चा अभ्यास जमत नव्हता. सरांनी तशी कल्पना दिली. परंतु ती सुचना त्याने मानली नाही. हट्टाने क्लास पूर्ण केला.

IIT च्या परिक्षेत यश मिळाले नाही. CET चा क्लास करण्यास वेळच नव्हता. CET चा अभ्यास स्वतःच केला व CET च्या परिक्षेत फारच कमी मार्क मिळाले. आता पुढील अभ्यासक्रमासाठी प्रवेश मिळविण्यासाठी खटपट चालू आहे.

माफक यशाबद्दल त्या मुलाला काहीच खंत वाटली नाही. आता ह्या गोष्टीचे आपण विश्लेषण करूया.
IIT प्रवेशपरिक्षा , CET व बारावीचा अभ्यासक्रम कागदावर कोणीही मुलगा करू शकतो. (Theoretical Possibility) हा मुलगा हुषार होता असे मानले गेले. (Technical Possibility) परंतु SSC पर्यंत मिळालेले मार्क हे भरपूर परिश्रम , सर्व विषयांचे क्लास वगैरे ढोर मेहनत करून मिळविलेले होते व त्यामुळेच ह्या मुलाकडे (Technical) तांत्रिक शक्यता पूर्ण पणे होती असे म्हणावे धाडसाचे ठरेल.

Practical Possibility पण विचार केला नाही. तीनही परिक्षांचे Focus वेगळे आहेत. त्याच्या तयारीला लागणारा वेळ अपूरा होता. दोन वर्षे चक्रात बसल्यासारखे सकाळी ६ ते रात्री ११ असा दिनक्रम करणे व हे सुद्धा एकाग्रपणे हे जरा अतीच आहे. वडिलांची सांपत्तिक स्थिती चांगली आहे.त्यामुळे IIT च्या क्लासची फी परवडू शकली.तीनही परिक्षेत बेताचे यश मिळाल्यानंतरसुद्धा ही गोष्ट पचनी पडत नाही.(Non–acceptance) परंतु ह्या माफक यशाचे Justification

होत आहे. अभ्यासाला वेळच नाही , तीनही परिक्षेचा Focus वेगळा होता. विषय जरी Common असले तरी त्याची तयारी वेगवेगळया पातळीवर करणे आवश्यक होते. क्लासमधील कोणालाच चांगले मार्क मिळाले नाहीत. ज्यांना चांगले मार्क मिळाले ते केवळ परिक्षेत Copy केल्यामुळेच. (आता Copy करण्याची Practical Possibility किती?)
आता इंजिनियरींगच्या कोर्ससाठी देणगी घेऊन प्रवेश घेतला जाईल. पण हा विचारांचा गुंता नीट सोडवला नाही तर पुढच्या आयुष्यात काही खरे नाही.

माझ्या मागील काही लेखात मी SWOT ह्या Concept चा विचार मांडला होता. S म्हणजे आपली बलस्थाने (Strength) , W म्हणजे आपला कमजोरपणा (Weakness) , O म्हणजे संधी (Opportunity) , T म्हणजे धोका (Threat). बरेच वेळेला घेतलेले निर्णय हे SWOT ह्या संकल्पनेचा विचार न करताच घेतलेले असतात. त्यामुळेच अपयशाची शक्यता असते. ह्या संकल्पनेला TTP/P ची जोड दिली तर यशाची खात्री बाळगायला हरकत नाही. खरेतर आपले ध्येय ह्या संकल्पनांचा विचार करूनच ठरविले पाहिजे.

आयुष्यातील अपयश किंवा अपेक्षित न मिळालेले यश , संकटे ही प्रथम स्वीकारावी लागतात. हे सर्व माझ्याच नशीबात का ह्या प्रश्नाला कोणतेच उत्तर नाही. ह्यासाठी अपयशाचे मूल्यमापन करणे गरजेचे असते.

प्रत्येकाला झटपट यश हवे असते. पण यशाचा मार्ग कठोर परिश्रमाच्या जंगलातून जातो. कोणतीही गोष्ट असो , आपण १00% परिश्रम करायचे , कामातला , अभ्यासातला आनंद घ्यायचा व यशाची चिंता परमेश्र्वरावर सोडायची. जेव्हा यशाबद्यलचा अंदाज आपल्या SWOT च्या अभ्यासातून घेतला जातो तेव्हा अपेक्षित यश प्रत्यक्षात मिळतेच. पण जेव्हा आपल्या कुवतीच्या बाहेर असलेले यश मिळावे म्हणुन आपण काम करतो तेव्हा आपली फसगत होते.

बघा विचार करून. आपल्या आयुष्यात घडलेल्या घटना , अपयश , मित्रांचे अनुभव ह्या सर्वांनी AJB & TTP ची फूटपट्टी लावून बघा. मला खात्री आहे की जर असे तुम्ही करू शकलात तर तुमच्या मनातील घालमेल , चिंता कमी होण्यास नक्कीच मदत होईल व तुम्ही एका नवीन विचाराने येणा–या संधीचा पाठपुरावा कराल व यशस्वी व्हाल.

Best of Luck… …